# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२५

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २२, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

-------------------------------------

### राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

**(१) * १८७६३ श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहामध्ये भोजन, सफाई आणि सुरक्षा यांचे कामकाज क्रिस्टल कंपनीकडे असून उक्त कंपनीकडून मागील अनेक दिवसांपासून गैरव्यवस्था, अनियमितता आणि विद्यार्थ्यांप्रती निष्काळजीपणा याबाबतच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता भोजनाचा खर्च हा पाच ते सहा हजार रुपये असताना शेवटच्या ठेकेदाराकडे फक्त ३५०० ते ४००० रुपये मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असून सफाई कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांचे पगार प्रलंबित असल्यामुळे स्वच्छतेचा व वसतिगृहातील सुरक्षारक्षक हजर राहत नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त कंपनीवर कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळांना भोजन पुरवठा करणेसाठीच्या ई-निविदेमध्ये सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ अन्वये मुंबई व पुणे विभागासाठी रू.५३९०/- प्रतिमहा

प्रति विद्यार्थी (रू.१७९.६६ प्रति दिवस प्रति विद्यार्थी) या दराने क्रिस्टल गौरमेंट प्रायव्हेट लिमिटेड JV with क्रिस्टल इंटिग्रेटेड प्रायव्हेट लिमिटेड या पुरवठादाराची निवड करण्यात आलेली आहे. तसेच सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक १९ जून २०२५ अन्वये भोजन पुरवठा करण्यासाठी नियुक्त भोजन पुरवठादारांच्या सेवा वार्षिक ८% दरवाढीसह सुरू ठेवणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये भोजन निविदेतील अटी व शर्तीनुसार मूळ पुरवठादार शासनाच्या मान्यतेने उप पुरवठादाराची नेमणूक करू शकेल अशी तरतूद आहे. यानुसार सद्यस्थितीत क्रिस्टल गौरमेंट प्रायव्हेट लिमिटेड JV with क्रिस्टल इंटिग्रेटेड प्रायव्हेट लिमिटेड यांचेमार्फत भोजन पुरवठा सुरू आहे.

साफसफाई-स्वच्छता व सुरक्षिततेच्या बाबतीत हे अंशत: खरे आहे. सफाई कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक यांचे वेतन वेळेत मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस लि. मुंबई यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. सदरची नोटीस प्राप्त होताच मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस लि.मुबई यांनी कामगांरांचे वेतन व भत्ते अदा केलेले आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करणेस दिरंगाई केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सामाजिक न्याय विभाग शासन निर्णय दिनांक १९ जून २०२५ अन्वये भोजन पुरवठादारांनी विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करताना ई निविदेतील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास पुरवठादारांना आकारावयाचे दंड निश्चित करण्यात आलेले आहेत. याअनुषंगाने भोजन पुरवठ्यामध्ये अनियमितता झाल्यास पुरवठादारांच्या देयकामध्ये क्षेत्रीय कार्यालयामार्फत दंड आकारण्यात येत आहे.

क्रिस्टल गौरमेंट प्रायव्हेट लिमिटेड JV with क्रिस्टल इंटिग्रेटेड प्रायव्हेट लिमिटेड या भोजन पुरवठादारावर कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही.

साफसफाई-स्वच्छता व सुरक्षिततेच्या बाबतीत मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस लि.मुंबई यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली होती. तसेच कर्मचाऱ्याचे वेतन व भत्ते अदा करणेस दिरंगाई केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाडापोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) येथील भूमाफीया, तलाठी व तहसिलदार यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(२) * १५६९१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाडापोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जमिन गट क्र.३८/४० मधील ४ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या श्रीमती जानकीबाई जैतु भंडारी या जमिन मालकीणीबरोबर भूमाफीया राजेंद्र राऊत यांनी नातेसंबंध दाखवून तहसिलदार व तलाठी यांच्याशी आर्थिक संगनमत करुन ४ गुंठे क्षेत्रफळाऐवजी ४० गुंठे इतकी जमिन दाखवून गैरव्यवहार केल्याचे दिनांक ८ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणात तलाठी यांनी पीक पाणी उताऱ्यावर जिथे जागाच नाही अशा ४० गुंठे क्षेत्रावर लागवड केल्याचे सातबारा उताऱ्यावर नोंद करुन वारस नोंदणी केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मौजे बाडापोखरण, ता.डहाणू येथील स.नं. ३८/४० चा जुना ७/१२ पाहता क्षेत्र ०.०४.० हे.आर ही जमीन फेरफार क्रमांक १८५२, दिनांक ०१/०७/१९५७ अन्वये वारसाने श्रीम.जानकीबाई जैतु भंडारी यांचे नाव दाखल झालेली आहे. श्रीम.जानकीबाई जैतु भंडारी दिनांक २८.०७.१९८६ रोजी मयत झाल्या आहेत. तद्नंतर मौजे बाडापोखरण ता.डहाणू येथील श्री.राजेंद्र दशरथ राऊत यांनी वारस तपास होणेकामी दिनांक २६/०९/२०२३ रोजी तलाठी सजा बाडापोखरण यांचेकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने फेरफार क्र. ८७६९ नुसार स.नं. ३८/४० व इतर सर्व्हे नंबरच्या सदरी वारसांचा अंमल होऊन १) अनंत दशरथ राऊत, २) राजेंद्र दशरथ राऊत, ३) अनिता किशोर पाटील यांचे नावाची नोंद करण्यात आली होती.

सदर फेरफार क्रमांक ८७६९ विरूद्ध श्रीम. लिलावती बाळकृष्ण कडू व इतर यांनी दाखल केलेल्या अपिलामध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी डहाणू विभाग, डहाणू यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०४/०३/२०२५ च्या आदेशान्वये उक्त फेरफार क्रमांक ८७६९ रद्द करून सदर जमिनीबाबत श्री.राजेंद्र दशरथ राऊत व इतर ०२ यांचा वारसाहक्क फेटाळून श्रीम. लिलावती बाळकृष्ण कडू व इतर यांचा वारसाहक्क मान्य करण्यात आला आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने स.नं. ३८/४० व इतर बाबत फेरफार क्रमांक ९०६९ दिनांक १९/०६/२०२५ व फेरफार क्रमांक ९१४२, दिनांक ०२/१२/२०२५ अन्वये मुळ खातेदार श्रीम.जानकीबाई जैतू भंडारी उर्फ कडू (मयत) व इतर यांचे नावे पुर्ववत करुन त्यांचे वारस श्रीम. लिलावती बाळकृष्ण कडू व इतर यांच्या नावाची नोंद घेण्यात आली आहे.

प्रकरणी श्री.राजेंद्र दशरथ राऊत व इतर यांनी स.नं. ३८/४० व इतर या जमिनीच्या मयत खातेदार श्रीम.जानकीबाई जैतु भंडारी यांच्याशी नातेसंबंध असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्याच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश शासन पत्र दिनांक ०४.१२.२०२५ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आले आहेत.

तसेच सर्व्हे नंबर ३८/४० च्या अनुषंगाने फेरफार क्रमांक ८७६९, दिनांक १८/०९/२०२३ ची नोंद घेताना सदर सर्व्हे नंबरचे जुने क्षेत्र ०.०४.० हे.आर ऐवजी क्षेत्र ०.४०.० हे. आर अशी नोंद घेण्यात आली होती. ही बाब निदर्शनास आल्यानंतर तहसिलदार, डहाणू यांनी ग्राम महसूल अधिकारी, बाडापोखरण यांना दिनांक ०६.११.२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यानुषंगाने ग्राम महसूल अधिकारी, बाडापोखरण यांनी सदरची तफावत सदर ७/१२ चे संगणकीकरण करताना झालेली आहे असा खुलासा सादर केला आहे.

तद्नंतर तहसीलदार डहाणु यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ अन्वये स.नं. ३८/४० च्या क्षेत्रामधील संगणकीकरण करताना जुने क्षेत्र ०.०४.० हे.आर ऐवजी क्षेत्र ०.४०.० हे.आर अशी झालेली तफावत फेरफार ९१३५, दिनांक १५.११.२०२५ अन्वये दुरूस्त केली आहे. तसेच सदर क्षेत्राबाबत झालेली चूक ही सदर सर्व्हे नंबरच्या ७/१२ चे संगणकीकरण करताना नजरचुकीने झाल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमुद केले आहे.

-----------------

## राज्य शासनाच्या बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विहीत वेळेत मिळण्याबाबत

**(३) * १५८९० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बार्टी, सारथी आणि महाज्योती या संस्थेमार्फत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील तीन वर्षांपासून शिष्यवृत्ती नियमितपणे व वेळेवर मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित विद्यार्थ्यांनी माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये पुणे येथील गोपाळ कृष्ण गोखले चौकात आक्रोश मोर्चा काढून 'कलाकार कट्टा' येथे ठिय्या आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती देणे तसेच त्यांच्या अन्य मागण्या निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष व नियमावली संबंधीचा अहवाल तसेच, सन-२०२३ व सन-२०२४ या वर्षाच्या अधिछात्रवृत्ती योजनेच्या जाहिराती लवकरात लवकर प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने आढावा बैठक दिनांक ०४.११.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

तसेच, यापूर्वी टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत सर्वंकष धोरणातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा व सदर स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.९.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरीत अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा उच्च व तंत्र शिक्षण विभागास सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार पीएच.डी अधिछात्रवृत्तीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष व नियमावली निश्चित होताच शैक्षणिक वर्ष २०२३ आणि २०२४ मधील पीएच.डी विद्यार्थ्यांकरीता जाहिरात प्रसिद्ध करून अधिछात्रवृत्ती योजनेची कार्यवाही सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सुधारित दराने आगाऊ आहार भत्ता अदा करण्याबाबत

**(४) * १५६४७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल**

**(मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शहराकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची गैरसोय होऊ नये यासाठी आदिवासी विकास विभागाकडून वसतिगृहे उभारण्यात आली असून शासनाकडून विद्यार्थ्यांना आहार भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय

(२) असल्यास, ठाणे येथील अप्पर आयुक्त आदिवासी कार्यालयावर वसतिगृहात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा वसतिगृहातील प्रवेश निश्चित झाल्यानंतर सात दिवसात तीन महिन्यांचा आगाऊ आहार भत्ता त्यांच्या बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे तथापि, सन २०२५ मध्ये माहे जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्यांचा भत्ता उशिराने माहे ऑगस्ट महिन्यात अदा करण्यात आला असल्याने अनेक विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांना नियमित आहार भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता, निर्वाह भत्ता डीबीटी सायकल दहा महिन्यापूर्वी न देता अभ्यासक्रम कालावधीप्रमाणे द्यावे तसेच शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदतीचे वितरण वेळेवर होण्यासाठी तसेच नवीन शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना सुधारित दराने भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे खरे आहे

(३) व (४) विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चितीनंतर सात दिवसांत तीन महिन्याचा आगाऊ आहार भत्ता देण्याची तरतूद आहे.

वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर वसतीगृह गृहपाल यांचेकडून सदर विद्यार्थ्यांस सायकल-१ अंतर्गत (माहे,जून,जुलै व ऑगस्ट) शिफारस केल्यानुसार सदर विद्यार्थ्यांना वेळोवेळी डी.बी.टी. अदा करण्यात येते. त्यानुसार ऑनलाईन प्रणालीमध्ये प्रवेशित शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांची डी.बी.टी. त्यांना अपर आयुक्त स्तरावरुन माहे जून,२०२५ मध्ये अदा करण्यात आलेली आहे.

त्यानंतर शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०२५ अन्वये आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्ता या मध्ये वाढ करण्यात आलेली आहे. सायकल ०१ चे पहिले देयक तयार करताना swayam.mahaonline.gov.in या पोर्टलवर महाआयटी कडून सुधारित दराने भत्ता अदा करण्याचा टॅब उपलब्ध नसल्याने सदरचे देयक जुन्या दराने विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खाती जमा करण्यात आलेले आहे.

तद्नंतर सुधारीत दराने भत्ता देण्याबाबत swayam.mahaonline.gov.in ह्या पोर्टलवर महाआयटी कडून ॲरिअर्स टॅब हा दिनांक १९.०९.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांची उर्वरित थकबाकी रक्कम ऑनलाईन त्यांच्या आधार संलग्न खात्यावर अपर आयुक्त, नाशिक/ठाणे/अमरावती व नागपूर कार्यालयाकडून अदा करण्यात आलेली आहे. तसेच सायकल ३ (डिसेंबर,

जानेवारी व फेब्रुवारी) विद्यार्थ्यांना वाढीव दराने मिळणेबाबत महाआयटी यांचेकडून आवश्यक बदल करण्यात आले असून विद्यार्थ्यांना आता एक रक्कमी सायकल ३ पासून वाढीव दराने अदा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बंजारा व धनगर समाजाला हैदराबाद गॅझेटच्या आधारे अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण देण्याबाबत

**(५) * १५६६३ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने स्थापन केलेल्या विशेषाधिकार समितीने दिनांक २ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार हैदराबाद गॅझेट मधील नोंदीनुसार मराठा समाजाच्या कुणबी प्रमाणपत्रास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त हैदराबाद गॅझेटमध्ये धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नोंदी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धनगर समाजाने अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत मागणी केली असून लोकप्रतिनिधींनीही लेखी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, हैद्राबाद गॅझेटच्या आधारे बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तहसिलदारामार्फत गोर सेनेतर्फे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
तथापि, धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींकडून इतर मागास बहुजन कल्याण विभाग व आदिवासी विकास विभागास निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(४) हे खरे नाही.
तथापि, गोर सेना यांनी दिनांक १०.०९.२०२५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयामार्फत दिनांक २५.०९.२०२५ रोजी शासनास सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या सागरी हद्दीत परप्रांतीय मच्छिमार बोटींनी घुसखोरी केल्याबाबत**

**(६) * १५६७७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.निलेश राणे (कुडाळ) :**सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सागरी हद्दीत विशेषतः रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात चीनच्या ६०० अवाढव्य फॅक्ट्री जहाजांसह परप्रांतीय मच्छिमार बोटींनी घुसखोरी करुन लाखो टन मासळीची लुट केल्यामुळे स्थानिक मच्छिमारांना समुद्रात मासे मिळणे कठीण झाल्याने त्यांच्यापुढे उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हद्दीत विदेशी व परप्रांतीय मच्छिमारांना मासेमारी करण्यास बंदी असताना आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, गोवा व गुजरात या परराज्यांतील शेकडो मच्छिमार बोटी राज्याच्या सागरी हद्दीत बेकायदेशीरपणे घुसखोरी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जहाजे आणि बोटी व्हेसल ट्रॅकवर स्पष्टपणे दिसत असून त्याबाबत स्थानिक मच्छिमारांकडून वेळोवेळी निदर्शनास आणून देखील संबंधित यंत्रणेने एकाही जहाज वा बोटीवर कारवाई केली नाही त्यामुळे सागरी सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुजरात सरकारने त्यांच्या सागरी हद्दीत परराज्यातील नौकांना मासेमारीसाठी बंदी घातली आहे, त्याच धर्तीवर राज्यानेही आपल्या हद्दीत असाच नियम लागू करुन राज्यातील मच्छिमारांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बेकायदेशीरपणे घुसखोरी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही. चीन येथील नौकांनी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी क्षेत्रात घुसखोरी केल्याचे निदर्शनास आलेले नाही. याबाबत स्थानिक मच्छिमार संघटना, संघ अथवा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यांचेमार्फत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसत नाही. उपजिवेकेचा प्रश्न निर्माण झाला नाही.

(२) राज्याच्या सागरी हद्दीत परप्रांतीय मच्छिमारांना मासेमारी करण्यास बंदी आहे. परराज्यातील नौकांनी राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी केल्यास अशा नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ (सु-२०२१) मधील कायद्याच तरतुदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही

(४) महाराष्ट्र राज्याच्या सागरी हद्दीत परराज्यातील नौकांना मासेमारीसाठी बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ (सु-२०२१) अंतर्गत अशा परराज्यातील नौकांवर कारवाई करण्यात येते.

(५) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ (सु-२०२१) अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील ०९ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १९ अशा एकूण २८ परराज्यातील नौकांवर सन २०२१-२२ पासून कारवाई करून एकूण रू.२.३६ कोटी इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कुटूंबांना वनहक्क पट्टे प्रदान करण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(७) * १६२५९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शेकडो आदिवासी कुटुंबांना वनहक्क निवाडे होऊन वन पट्टे देण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे आदिवासी वनहक्क धारक श्रमिक संघटनेने दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढून धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना त्यांच्या हक्काचे पट्टे देण्याची प्रक्रिया पूर्ण करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंतर्गत १८५२८ वैयक्तिक वन हक्क दावे प्राप्त झाले असुन त्यापैकी १५६५८ वनहक्क दावे निकाली काढण्यात आले आहेत. यापैकी ६६४७ दावे मंजूर करण्यात आले असून सदर दावेदारांना वनहक्क पट्टे प्रदान करण्यात आले आहेत. उर्वरीत प्रलंबित असलेल्या २८७० दावे निकाली काढणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून संबंधित उपविभागीय अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.खराब धानोरा (ता.पालम, जि.परभणी) ग्रामपंचायती अंतर्गत खरीप हंगामातील सोयाबीन पीक कापणी प्रयोगामध्ये झालेला गैरव्यवहार

**(८) * २०३७० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खराब धानोरा (ता.पालम, जि.परभणी) येथे धानोरा ग्रामपंचायती अंतर्गत खरीप हंगामातील सोयाबीन पीक कापणी प्रयोग दिनांक १४ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यादरम्यान तालुका कृषी अधिकारी, विमा कंपनीचे अधिकारी व विमा समितीचे सदस्य व शेतकरी यांचेसमोर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रयोगादरम्यान शेतकऱ्यांच्या निदर्शनास आलेल्या वजन काटा गैरव्यवहारप्रकरणी कंपनीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी पालम तहसिल कार्यालयात रात्रभर ठिय्या आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पीक कापणी प्रयोगाच्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि पीक विमा मिळू नये यासाठी ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडियाने सदोष वजनी काटे वापरुन ग्रामस्तरीय विमा समितीच्या संबंधित शेतकऱ्यांची फसवणूक केली त्यामुळे या प्रकरणी तालुका कृषी अधिकारी यांच्या फिर्यादीवरुन पालम पोलिसांनी सदर कंपनीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) मौजे खराब धानोरा, तालुका पालम, जिल्हा परभणी येथे प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम सन २०२५-२६ अंतर्गत दिनांक ०७.१०.२०२५ रोजी सोयाबीन पिकाचा पीक कापणी प्रयोग ग्रामपंचायत अधिकारी, पीक विमा कंपनी प्रतिनिधी व ग्रामस्तरीय समिती यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

तथापि, सोयाबीन पिकाच्या दाण्यातील आर्द्रतेमुळे त्याच्या सुकवणीचे वजन दिनांक १३.१०.२०२५ रोजी घेण्यात आले.
(२) व (३) होय.
(४) भारतीय कृषि विमा कंपनीच्या प्रतिनिधींकडील वजन काटा सदोष आढळून आल्याने, त्यांच्या विरुद्ध पालम पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील उपविभागीय अधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करुन शासकीय पडीक व गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल केले नसल्याबाबत

**(९) *१८२९३ श्रीमती सई डहाके (कारंजा):** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागासवर्गीय आणि इतर भूमिहीन व्यक्तींची शासकीय पडीक व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे दिनांक १ एप्रिल, १९७८ ते दिनांक १४ एप्रिल, १९९० या कालावधीतील पात्र ठरवून अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन निर्णयान्वये यवतमाळ जिल्ह्यात एकूण १७१८ व्यक्ती आणि २६०९.२३ हेक्टर आर क्षेत्र विहित अटी-शर्तींनुसार पात्र ठरवून संबंधित अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत निर्देश जारी करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १२ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपात्र अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत दिशानिर्देश जारी करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, यवतमाळ यांनी वरील शासन निर्णयांचा चुकीचा अर्थ लावल्याने तसेच महसूल व वन विभागाचे दिनांक ९ मार्च, २००७ रोजीच्या परिपत्रकाकडे दुर्लक्ष करून कर्तव्यात कसूर व अधिकाराचा गैरवापर करून अतिक्रमणाखालील एकूण क्षेत्र व संबंधित पात्र व्यक्तींना नियमानुकूल करून देण्याबाबतचा विनंती अर्ज नाकारल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर शासन निर्णयान्वये यवतमाळ जिल्ह्यात एकूण १७१८ व्यक्ती व २६०९.२३ हे.आर क्षेत्र विहित अटी व शर्तीनुसार पात्र/अपात्र ठरवून अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते. सदर निर्देशान्वये यवतमाळ जिल्ह्यातील एकूण १३९५ व्यक्ती व २१२२.०३. हे.आर क्षेत्रावरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात आली असून एकूण ३२३ व्यक्ती व ४८७.२ हे.आर.क्षेत्रावरील अतिक्रमणे अपात्र ठरविण्यात आली होती.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २८.११.१९९१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यातील एकूण पात्र १३९५ व्यक्ती व २१२२.०३. हे.आर क्षेत्रावरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात आले असून एकूण ३२३ व्यक्ती व ४८७.२ हे.आर.क्षेत्रावरील अतिक्रमणे अपात्र ठरविण्यात आली होती. तरी, दिनांक २८.११.१९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्देशित केलेल्या सर्व प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली असल्याने दिनांक ०९.०३.२००७ रोजीच्या परिपत्रकाकडे उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत नाही.

तसेच सद्यस्थितीत उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांना नव्याने अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जावर शासन निर्णय दिनांक १२.०७.२०११ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## डाब (ता.अक्कलकुवा, जि.नंदूरबार) ग्रामपंचायत हद्दीतील पाड्यांमध्ये रस्ते व वरखेडी नदीवर पूल बांधण्याबाबत

**(१०) * १७६५८ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुका हा राज्यातील अत्यंत दुर्गम व आदिवासीबहुल तालुका असून, डाब ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पाड्यांमध्ये अजूनही रस्ते, पाणी व शिक्षणाच्या मुलभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीच्या हद्दीतील डाबच्या पिपलोदा पाडा, ढोणापाणी पाडा, तामणाईमालपाडा, केटा पाडा, ईऱ्या-पिर्या पाडा, इत्यादी गावांतील शेकडो विद्यार्थी व लहान बालके दररोज जीव धोक्यात घालून वरखेडी नदी व इतर नाले पायवाटेने पार करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वरखेडी नदीवर पूल व पाड्यांमध्ये रस्ते मंजूर करण्याची मागणी शासनाकडे केली असूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने वरखेडी नदीवर पूल बांधणे आणि तामणाई-ढोणापाणी पाडा रस्ता मंजूर करून काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे, अंशत: खरे आहे.
(३) व (४) जिल्हाधिकारी, नंदुबार यांच्या दिनांक २०.१०.२०२५ व दिनांक ४.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अक्कलकुवा तालुक्यातील १५ दुर्गम पाडयांना जोडण्यासाठी नदी-नाल्यावर साकव बांधकामाचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांना देण्यात आले आहेत. मंजूर साकव बांधकामासाठी जोडरस्त्यांच्या कामाचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे.

वरखेडी नदीवर पुल बांधणे आणि तामणाई ढोणापाणी पाडा यांना जोडणारे रस्ते या कामाचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव संबधित यंत्रणेकडे सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागात वैयक्तिक फळबाग लागवड योजना व तत्सम योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * १९४९२ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कार्यालयात सन २०१९ ते माहे ऑगस्ट, २०२३ या कालावधीत संबंधित अधिकारी व तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांच्या संगनमताने वैयक्तिक फळबाग लागवड योजना व तत्सम योजनांमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने वैयक्तिक फळबाग लागवड योजना व अन्य तत्सम योजनांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) हे खरे नाही.

जालना जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागांतर्गत ८ परिक्षेत्रामध्ये सन २०१९ ते ऑगस्ट, २०२३ या कालावधीत नियोजन विभागाच्या (रोहयो प्रभाग) दिनांक १२.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर फळझाड व वृक्षलागवडीची कामे करण्यात आली आहेत.

नियोजन विभागाच्या (रोहयो प्रभाग) दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार फळझाड व फुलपीक लागवड कार्यक्रम ग्रामपंचायती व कृषी फलोत्पादन विभागामार्फत आणि वृक्षलागवड कार्यक्रम सामाजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात येतात. सदर शासन निर्णयानंतर वैयक्तिक शेतक-यांच्या शेत जमिनीवर फळबाग लागवड वन विभागामार्फत करण्यात आलेली नाही.

उपरोक्त कामांचा पूर्ण निधी DBT पध्दतीने संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांचे बॅंक खात्यात जमा करण्यात आला असून सर्व प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली आहे. या योजनेत गैरव्यवहार झाल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानवाच्या निसर्गावरील अनियंत्रित हस्तक्षेपामुळे सहयाद्रीच्या जैवविविधतेवर परिणाम होत असल्याबाबत

**(१२) * १५९९५ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सहयाद्रीच्या खोऱ्यातील माती उत्खनन, दगडांच्या खाणी, मानवाचे अतिक्रमण, फार्म हाऊस, रस्त्यांची खोदाई आणि अनियंत्रित विकासाचा परिणाम सहयाद्रीच्या जैवविविधतेवर होत असल्याचे माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवाच्या निसर्गावरील अनियंत्रित हस्तक्षेपामुळे सहयाद्रीची धूप १२१ टक्क्यांनी वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील खाडया, धरणे व नदया गाळाने भरल्या असून ठिकठिकाणी सॅण्ड वॉल तयार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त खाडया, धरणे, नदया गाळमुक्त करणे, कांदळवनांचे संवर्धन, नद्यांचे सीमांकन करुन पूररेषेचे पुन:श्च सर्वेक्षण करणे तसेच सहयाद्री खोऱ्यातील नैसर्गिक आपत्तीची तीव्रता अधिक वाढण्याची शक्यता लक्षात घेता एक कालबध्द कार्यक्रम आखण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, काही क्षेत्रामध्ये वन क्षेत्रावर अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, मानवाच्या निसर्गावरील हस्तक्षेपामुळे जैवविविधतेवर होणारे परिणाम तसेच वनराईचे कमी होत असलेले प्रमाण वाढविण्यासाठी विविध योजनांतर्गत वृक्ष लागवड करण्यात येत आहे.

तसेच जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार रायगड जिल्ह्यातील सावित्री नदी व रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्ठ नदीमध्ये गाळ आढळून आला आहे.

(४) व (५) कांदळवन संवर्धनासाठी कांदळवन कक्ष स्थापन केलेला असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कांदळवन संरक्षण व संवर्धन प्रभावीपणे कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच पश्चिम घाटातील पर्यावरणीय संवेदनशीलता लक्षात घेता सदर क्षेत्रातील १७,३४० चौ. कि.मी. क्षेत्र पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरीता केंद्र शासनाने अधिसूचना जारी केली आहे. यासोबत पश्चिम घाटातील वनक्षेत्रामध्ये संरक्षीत वने, अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान व संवर्धन राखीव घोषित करण्यात आले आहे.

जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार पूररेषांचे सर्वेक्षण व आखणी अंतर्गत प्रमुख नद्या उदा. मुरबाडी, काळू, शाई, उल्हास इ.नद्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. तसेच पुन:श्च सर्वेक्षणाबाबत सद्य:स्थितीत कोणतेही धोरण नाही.

तथापि, सदर प्रकरणी शासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना वेळोवेळी करण्यात येत आहेत.

-----------------

**वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनेक जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर असलेली शत्रू संपत्तीची नोंद रद्द करण्याबाबत**

**(१३) * १६७५४ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर ) शहर महानगरपलिका क्षेत्रात अनेक जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर "शत्रू संपत्ती" (ENEMY LAND) व "हस्तांतरण बंदी" अशी नोंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी सुमारे ४० ते ५० वर्षांपुर्वी भारतीय नागरिकांच्या नावे खरेदीखत किंवा इतर कायदेशीर मार्गाने हस्तांतरीत झाल्या असून तत्कालिन विकास प्राधिकरणांनी त्या जमिनींवर बांधकाम करण्यासाठी परवाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपत्ती नोंदीवर सन २०२३ मध्ये हस्तांतरणात बंदी असा शेरा पडल्यामुळे त्या जमीनीवर वर्षानुवर्षे रीतसर परवाना घेऊन उभ्या असलेल्या इमारतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकास करण्यासाठी खूपच अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जमिनींवर शत्रू संपत्ती अशी असलेली नोंद रद्द करण्याची मागणी बाधित रहिवाशांकडून शासनास केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी वसई–विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनेक जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर असलेली "शत्रू संपत्ती" (ENEMY LAND) नोंद रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शत्रु संपत्ती हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सामाजिक न्याय विभागाच्या 'महाज्योती' संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज सादर करताना 'भटक्या जमाती-क' प्रवर्गात 'धनगर' या पोट जातीचा समावेश करण्याबाबत**

**(१४) * १५८६८ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बार्टी, सारथी, टीआरटीआय, महाज्योती व आर्टी या संशोधन व प्रशिक्षण संस्थांच्या वतीने स्पर्धा परीक्षा व कौशल्यावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी 'महाज्योती' संस्थेकडून सीईटी सामाईक

प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात येत असून त्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करताना 'भटक्या जमाती-क' प्रवर्गात पोट-जात 'धनगर' येत नसल्याने अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षांसाठी अर्ज सादर करताना 'भटक्या जमाती-क'' समोर पोट-जातीचा पर्याय द्यावा लागत असून तिथे धनगर समाजातील बंडगर, सनगर, अहीर व खुटेकर आदी २९ पोट-जाती असून पश्चिम महाराष्ट्रातील अनेक 'भटक्या जमाती-क'' प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्रावर 'हिंदु धनगर' असा उल्लेख असून अर्जामधील पोट-जातीच्या पर्यायामध्ये 'हिंदु धनगर' हा पर्यायच दिलेला नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज बाद ठरण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त संकेतस्थळावर सुधारणा करण्यासाठी व बाधित विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

एकसमान धारेणाअंतर्गत महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या परीक्षापुर्व प्रशिक्षणाकरीता बार्टी संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात आले होते, सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणांकरीता अर्ज करतेवेळी 'भटक्या जमाती-क' प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता 'भटक्या जमाती-क' प्रवर्गात असलेल्या धनगर या जातीसह सर्व पोट-जातीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला होता.

(२) हे खरे नाही.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज चाळणी परीक्षेकरीता पात्र ठरविण्यात आले होते. कोणत्याही विद्यार्थ्यांचे अर्ज बाद झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागापूर (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील अनुदानित निवासी आदिवासी आश्रम शाळेतील पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून झालेला अपघात

**(१५) * १७७३२ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागापूर (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील अनुदानित निवासी आदिवासी आश्रम शाळेतील पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून सुमारती सोमा जामुनकर या १४ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनी जखमी झाल्या असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेच्या इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यात आली होती काय तसेच सदर दुर्घटनेत जखमी झालेल्या विद्यार्थिनींवर उपचार करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करून उक्त दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे. सदरची घटना दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी सायं.६.३० वाजता घडली आहे.
(२) व (३) आश्रमशाळेच्या इमारतीची व पाण्याच्या टाकीची संरचनात्मक तपासणी करण्यात आलेली नव्हती. जखमी विद्यार्थीनींवर परतवाडा येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. तसेच याप्रकरणी मृत विद्यार्थीनीच्या पालकांना दोन लाख रूपये इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. सदर शाळेचे मुख्याध्यापक व स्त्री अधिक्षिका यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालयात**
**अनियमितता होत असल्याबाबत**

**(१६) * १५७५६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील रिंग रोडवरील कोतवाल नगरातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालयात महसूल मंत्री यांनी छापा टाकला असता काही अधिकाऱ्यांच्या ड्रॉवरमध्ये पैसे आढळले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयातील रजिस्ट्री प्रक्रियेमध्ये अनियमितता होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी महसूल मंत्री यांनी सदर कार्यालयातील अनियमिततेबाबत पोलिसांना सर्व माहिती घेवून तपास करण्याबाबत सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय ,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) श्री.अनिल तुळशीराम कपले, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नागपूर शहर क्र.४ यांना दिनांक ०९.१०.२०२५ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांचे अनुदान मिळण्याबाबत

**(१७) * १५७८४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी कृषी योजनांतील अनुदानाच्या मागणीकरीता केलेले ४८ लाख अर्ज शासनाकडे दाखल असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्ज हे कृषी यंत्रे तसेच अवजारांवर मिळणारे अनुदान, सूक्ष्म सिंचन योजनेतील अनुदान त्याबरोबरच मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रियेचे अनुदान, फलोत्पादन योजनेतील अनुदान व शेततळयासाठी काही शेतकऱ्यांनी खर्च केलेल्या रक्कमेसह अनुदान मिळत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान वाटपाकरीता किती निधीची गरज आहे त्यापैकी केंद्र तसेच राज्य शासनाकडून किती निधी मिळू शकेल याचा अंदाज न घेता कृषी विभागाने अर्ज मागवून अनुदान देण्यात न आल्यामुळे शेतकरी अनुदानासाठी कृषी विभागाकडे ये-जा करीत असून शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत विविध योजनेंतर्गत प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर ४६,५८,३२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता प्रश्नामध्ये नमूद योजनेसाठी अर्थसंकल्पित निधी, प्रशासकीय मान्यता व वितरीत निधी याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे:-

(रुपये लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | अर्थसंकल्पित निधी | प्रशासकीय मान्यता | वितरीत निधी |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान | २२५९०.०० | २०४१४.५८ | ८२६७.०० |
| २ | राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण | ४००००.०० | ४००००.०० | २००००.०० |
| ३ | प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PDMC) | ५०४८३.१७ | ५९६५८.३३ | २५१४१.७० |
| ४ | मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना (Topup) | ४००००.०० | ४००००.०० | १००००.०० |
| ५ | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना | १०४५०.०० | १०४५०.०० | ६२७०.०० |
| ६ | मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे | १००००.०० | १००००.०० | ०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना | ७५००.०० | ४५००.०० | ३१९७.७५ |
| ८ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना | १७५४१.६७ | १७०८३.३३ | ६८३३.३३ |

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेकरिता हिवाळी अधिवेशनात रु.१२७.७१ कोटी निधीची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. तसेच केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत दुसऱ्या हप्त्याच्या निधी मागणीचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयार्मात केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत**

**(१८) * १५६२० श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.निलेश राणे (कुडाळ), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अनिल पाटील (अमळनेर),**

**श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.शेखर निकम (चिपळूण), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.सुमित वानखेडे (आर्वी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानीसह शेतकऱ्यांची घरे, जनावरे व त्यांचे गोठे, शेतमाल, विहीरी, फळबागा यांचे नुकसान झाल्याने तसेच पिके व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, फुल शेती, व्यावसायिकांची दुकाने, मच्छिमार, शाळांची पडझड, पाणीपुरवठा योजना व विज यंत्रणा नादुरुस्त होणे इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या १७ लाख ८५ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली असून शेतजमिनी वाहून गेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अतिवृष्टी व महापुरामुळे मच्छिमारांवर संकट निर्माण झाल्याने याबाबत शासनाने मत्स्यबिजाची आकडेवारी व वस्तुनिष्ठ अहवाल दहा दिवसात सादर करण्याचे संबंधितांना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, जनावरांना मदतनिधी वितरीत करताना बाजारभावाप्रमाणे न करता शासनाने राष्ट्रीय आपत्ती निवारण मदत निधीच्या निकषानुसार ३ जनावरांच्या मर्यादेत मदत जाहीर केली असून तीनपेक्षा जास्त जनावरांचा मृत्यू झाल्यास कोणतीही मदत मिळणार नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे न होणे, पंचनामे वस्तुनिष्ठ नसणे, शेतकऱ्यांना मिळणारी मदत अपुरी, केवायसी करुनही बँक खात्यात रक्कम जमा न होणे, पर्जन्यमापकांतील दोष इ. अनेक कारणास्तव शेतकरी या नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत तसेच काही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन विमा कंपन्यांना निर्देश देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व मच्छिमारांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करुन त्यांना विशेष आर्थिक मदत पॅकेज देण्यात यावे तसेच पुरामुळे खरडून गेलेल्या जमिनीसाठी एनडीआरएफची अल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांची अट रद्द करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्याचे मा.मुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, कृषी मंत्री व मत्स्यव्यवसाय मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकरी, मच्छिमार, व्यावसायिक यांच्या नुकसानाबाबत पंचनामे करुन तात्काळ नुकसान भरपाई देणे तसेच मृत जनावरे व व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याबाबत तसेच सार्वजनिक मालमत्तेची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय.

(२) राज्यातील ३४ जिल्हात अतिवृष्टी व पूरामुळे शेतकऱ्याच्या ९५ लाख हेक्टर वरील पिके बाधित झालेली आहे, तसेच ४६४६८ हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झालेले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२५ अन्वये घोषित विशेष मदत पॅकेज नुसार अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीकरीता मत्स्यव्यवसायिकांना मदत देण्याकरीता कार्यप्रणाली/मार्गदर्शक सूचना कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या दिनांक २९.१०.२०२५ च्या शासन निर्णयाने निर्गमित करण्यात आलेले आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ अन्वये नुकसानग्रस्त पशुपालकांना शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०२३ रोजीच्या निकष व दरानुसार नुकसानभरपाईची रक्कम नैसर्गिक आपत्ती निधी मधून देण्यात येत आहे. तसेच दिनांक २७ मार्च, २०२३ च्या निकषाबाहेरील वाढीव पशुधन हानी झालेल्या पशुधनाच्या नुकसानीची भरपाई करताना कमाल पशुधनाची अट शिथिल करुन नुकसान भरपाई देण्यात येत आहे.

(५) राज्यात खरीप २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करुन शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२५ अन्वये जाहिर केलेल्या विशेष मदत पॅकेजनुसार शेतीपिक नुकसान, शेतजमीन नुकसान, पशुधन, रब्बी हंगामात उपयोगी पडावे यासाठी बि, बियाणे व खते इत्यादी साठीची मदत देण्यात येत आहे. यासाठी बहुतांश शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅकमधील माहितीचा वापर करुन तसेच उर्वरित शेतकऱ्यांचे e-KYC करुन निधी तात्काळ बाधित शेतकऱ्यांचे खात्यात जमा करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर सुरु आहे.

(६) होय.

(७) राज्यात अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे त्वरीत करुन त्यांना शासन निर्णय दिनांक १०.१०.२०२५ अन्वेय विशेष मदत पॅकेज नुसार निधी मंजूरीबाबतचे आदेश निर्गमित करुन, मदत वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद क्षेत्रातील नझुल जागेवरील घरांना स्थायी पट्टा देण्याबाबत

**(१९) * १७२८९ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील अनेक नागरिक वर्षानुवर्षे नझुल जमिनीवर घरे बांधून वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील ३९ झोपडपट्ट्यांमध्ये सुमारे ११,८८१ कुटुंबे राहत असून केवळ १४ झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण झालेले आहे, उर्वरित २५ झोपडपट्ट्यांचे अद्यापही सर्वेक्षण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र. २९/१, २६३, २६४, २६५, २६६, ३१७, ३१८ या शासकीय जमिनीवर मागील ३० वर्षापासून अनेक कुटुंब वास्तव्य करीत असून उक्त रहिवाश्यांकडून शासनाचा कर भरण्यात येत असतानाही सुमारे १३०० कुटुंबियांना स्थानिक प्रशासनाकडून अतिक्रमण नोटीसा बजावण्यात आल्यामुळे त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद क्षेत्रातील नझुल जागेवरील घरांना स्थायी पट्ट्यांची मागणी नझुल जमिनीवरील भोगवटाधारक नागरीकांकडून व लोकप्रतिनिधींकडून मागील अनेक वर्षापासून मा.जिल्हाधिकारी व आयुक्त, चंद्रपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, घुग्गुस नगरपरिषद, संबंधित तहसिलदार तसेच मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नझुल जमिनीवरील घरे व त्यांचे भोगवटाधारक बेघर होण्यापासून वाचवण्यासाठी तसेच मुलभूत नागरी सोयीसुविधा व शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

चंद्रपूर महानगरपालिकेकडून ३६ झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाले असुन ०३ झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झालेले नाही. शासकीय जमीनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात PUBLIC INTEREST LITIGATION क्र.५४/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजीच्या शासकीय जागेवरील अतिक्रमणाबाबत पारित केलेल्या आदेशातील निर्देशानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्रान्वये चंद्रपूर तालुक्यातील शासकीय जागेवरील केलेले अतिक्रमण काढुन टाकण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्याअनुषंगाने शासकीय जागेवरील अतिक्रमण काढण्याकरीता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये घुग्घुस येथील शासकीय सर्व्हे क्र. २९/१, २६३,२६४,२६५, २६६, ३१७ व ३१८ मध्ये रहिवासी असलेल्या १३८५ नागरीकांना नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत. परंतु अद्यापपावेतो कुठल्याही अतिक्रमण धारकांवर अतिक्रमण निष्काषनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) आयुक्त, मनपा यांचेकडून सदर झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात आले असुन १४ झोपडपट्टयांचे अभिन्यास नकाशे तयार करण्यात आले आहेत. तसेच, घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र. २९/१, २६३, २६४, २६५, २६६, ३१७, ३१८ या शासकीय जमिनीची उपअधिक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर या कार्यालयाव्दारे मोजणी झालेली असुन एकत्रित अभिन्यास बनविण्याचे तसेच सर्व्हेक्षणाचे काम जिल्हास्तरावर प्रगती पथावर आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रलंबित कृषी योजनांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) * १७८९१ श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरण, सिंचन, फलोत्पादन व तत्सम योजनांचा लाभ देण्यासाठी डीबीटी प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१-२२ ते सन २०२४-२०२५ या गत चार वर्षात योजनांसाठी एकूण ४८ लाख शेतकऱ्यांनी अर्ज सादर केले असून, या सर्व अर्जांची छाननी अद्याप पूर्ण न झाल्याने शेतकरी लाभापासून वंचित राहिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अर्जांची छाननी व लाभ वितरणासाठी एकूण ४४ हजार ६३७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, निधीअभावी हे सर्व अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रलंबित अर्जदारांना आता “कृषी समृद्धी योजना” अंतर्गत समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित अर्जदारांची निकड विचारात घेऊन उक्त योजनेंतर्गत त्यांना निधी उपलब्ध करून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ या कालावधीत ५६.१७ लाख अर्ज प्राप्त होते. त्यापैकी विविध योजनांतर्गत प्राप्त वित्तीय लक्षांकाच्या मर्यादेत, मंजूर केलेल्या बाबीची/घटकाची कामे पूर्ण केलेल्या १८.४६ लाख लाभार्थ्यांना रक्कम रु.६५२१.४० कोटी अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात आले आहे.
(३) महा-डीबीटी पोर्टलवर प्राप्त सर्व अर्जांना १००% अर्थसहाय्य/अनुदान द्यावयाचे झाल्यास त्याकरिता रू.४४,६३७ कोटी निधीची आवश्यकता आहे. तथापि अर्ज केलेले सर्वच शेतकरी मंजूर बाबींचा लाभ घेत नाहीत, हा पुर्वानुभव आहे. त्यामुळे सन २०२५-२६ मध्ये यापैकी ४६.७० लाख लाभार्थ्यांची FCFS प्रक्रियेद्वारे निवड केलेली आहे.
(४) होय.
(५) शेतकऱ्यांनी मंजूर केलेल्या बाबींची कामे पूर्ण केल्यानंतर त्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकरदन, अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील महसूल विभागात सुमारे ४० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(२१)** * **१५९३० श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन, अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील महसूल विभागात सुमारे ४० टक्के पदे रिक्त असल्याने शासकीय कामकाज ठप्प असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे पंचनामे करणे, तक्रारींचे निराकरण करणे व शेतकऱ्यांना मदत करणे यासारख्या कामांमध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व कामांचा प्रचंड ताण उपलब्ध व अपुऱ्या मनुष्यबळावर होत असल्याने नागरिकांच्या कामांना मोठा विलंब होत असून त्यांना वारंवार तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांच्यामध्ये नाराजीची व तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

भोकरदन, अंबड व घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील एकूण मंजूर २७८ पदांपैकी केवळ ३७ पदे रिक्त आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ११ जिल्हयातील पेसा ग्रामपंचायतीमधील आदिवासी लाभार्थी लोकनेते बिरसा मुंडा योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत

**(२२) * १६६०९ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील ग्रामपंचायतीसाठी केंद्र शासनामार्फत लोकनेते बिरसा मुंडा ही योजना राबविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ व सन २०२०-२१ या वर्षात सदर योजना राबविताना राज्यातील पेसा ग्रामपंचायतींना त्याचा फायदा झाला आहे काय तसेच सदर योजनेचे पुनर्विनियोजन झाले आहे काय याबाबतची माहिती पेसा अभ्यासक डॉ.कुंडलिक केदारी यांनी संबंधित विभागाकडून मागविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा निधी केंद्र शासनाच्या जनजातीय कार्य मंत्रालय पेसा सामूहिक वनहक्क आराखडयासाठी वळवून पुनर्विनियोजित केल्याने राज्यातील ११ जिल्ह्यातील पेसा ग्रामपंचायतीतील आदिवासी लाभार्थी वंचित राहिल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लोकनेते बिरसा मुंडा योजनेपासून राज्यातील वंचित राहिलेल्या गावांना लाभ देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून सदर योजनेचे पुनर्विनियोजन करण्यात आले आहे. याबाबत पेसा अभ्यासक डॉ. कुंडलिक केदारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) व (४) सदर योजनेचे पुनर्विनियोजन जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून करण्यात आले असून गडचिरोली व यवतमाळ या आदिम बहुल जिल्हयातील सामूहिक वन व्यवस्थापन व संवर्धनाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये सिमेंट चेक डॅम, गोडाउन, गॅबियन चेक डॅम, नर्सरी, स्मशानभूमी, दवाखाने, सांस्कृतिक भवन, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ग्रंथालय, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र इ. कामांचा समावेश आहे. सदर योजनेचा लाभ पेसा व आदिवासी क्षेत्रातील गावांनाच मिळणार आहे.

तसेच केंद्र शासनामार्फत राज्यातील आदिवासी गावांच्या विकासासाठी प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना (PMAAGY), प्रधानमंत्री जनमन अभियान (PM-JANMAN), धरती आबा जनजाती ग्रामउत्कर्ष अभियान (DA-JGUA) यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील वन जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(२३) * १६२९५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग विभागातील एकूण वन क्षेत्रापैकी १७२.३०९९ हेक्टर क्षेत्रावर सन १९७८ पासून असलेल्या अतिक्रमणांवर वन विभागाने कारवाई करत २४.६९७७ हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमणे हटवून जागा वन विभागाने ताब्यात घेतली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अतिक्रमित जागा ताब्यात घेण्यासह अतिक्रमित जमिनीची २९६६ प्रकरणे आतापर्यंत प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) सन १९७८ पासून वन जमिनीवरील झालेले अतिक्रमण वन विभागाद्वारे सातत्याने हटविण्यात येत असून सुमारे २४.२४५७ हे. क्षेत्रावरील अतिक्रमण हटवून क्षेत्र ताब्यात घेतले आहे. अतिक्रमण हटविणे ही अव्याहत चालणारी प्रक्रिया असून सद्यस्थितीत माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर २९९८ अतिक्रमणाची प्रकरणे प्रलंबित असून सुमारे २३.०८०९ हे. क्षेत्रावरील अतिक्रमणे हटविण्यात येऊन अद्याप १४९.२२२९ हे.आर क्षेत्र अतिक्रमणाखाली आहे.

वन जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याकामी व अतिक्रमण नष्ट करण्याकामी तात्काळ कारवाई करण्यात येते. तसेच काही अतिक्रमकांविरुध्द न्यायालयात प्रकरणे दाखल करुन उर्वरित अतिक्रमण हटविण्याकामी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ व ५४ अंतर्गत अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येते. तसेच काही ठिकाणी वनक्षेत्रातील अतिक्रमणाच्या अनुषंगाने वनहक्क कायद्यांतर्गत दाखल दावे प्रकरणी अंतिम दावे मंजूरीची कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करता येत नाही.

वनक्षेत्रातील विविध अतिक्रमणास आळा बसावा म्हणून प्रादेशिक वन अधिकारी/कर्मचारी वर्गाव्दारे दक्षता घेण्यात येत आहे. तसेच अतिक्रमणास संवेदनशील क्षेत्र निश्चित करण्यात येऊन अशा वनक्षेत्राची संपूर्ण तपासणी संरक्षण कर्मचारी/गस्त पथक व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमितपणे केली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून नियमित बीट तपासणी केली जाते. तसेच वनक्षेत्राचे सर्व्हेक्षण व सिमांकन करण्यात येऊन त्याठिकाणी तात्काळ बुरुज लावण्याची कामे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या नोंदी पूर्ववत करण्याबाबत

**(२४) * २०६५५ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध देवस्थानांतील देवाची सेवा करणाऱ्या गोंधळी, गुरव व पुजारी इत्यादी समाजांना छत्रपती शिवाजी महाराज व संस्थानिकांच्या काळात उपजीविकेसाठी देण्यात आलेल्या देवस्थान इनाम जमिनी सन २०१० नंतर महसूल खात्याने "भोगवटादार" कॉलममधून काढून "इतर अधिकार" या कॉलममध्ये केल्यामुळे सदर समाजाचे वारसा हक्क व उपजीविका धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजातील लोकांकडून मंदिरांची साफसफाई, देवपूजा, दिवाबत्ती, देखभाल, आरती ही कामे कायमस्वरुपी व सेवाभावी करत असून त्यांच्याकडील जमीन ही १ ते २ एकर एवढी अत्यल्प असतानाही उक्त निर्णयामुळे सदरहू समाजांवर अन्याय होत असल्याने किसानसभा सारख्या अनेक संघटनांनी आंदोलने, मोर्चा व शासनाकडे अनेक निवेदने देऊनही कोणताही निर्णय अद्यापि झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देवस्थान इनाम जमिनींच्या नोंदी पूर्ववत करण्याबाबत गोंधळी, गुरव व पुजारी समाज यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी जमिनी पुन्हा संबंधित देवसेवेकरी समाजास मालकी हक्काने सशर्त (अहस्तांतरणीय) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील उपरोक्त समाजाच्या इनाम जमिनी मालकी हक्काने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण झाले असल्यास त्या जमिनी देवस्थानाच्या नावे पूर्ववत करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०.०७.२०१० तसेच महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. डीईव्ही-२०१५/प्र.क्र.१५१/ज-१अ, दिनांक ०६.११.२०१८ अन्वये दिशानिर्देश देण्यात आले आहेत. तथापि, अशा देवस्थान इनाम जमिनीच्या गाव नमूना नं.७/१२ भोगवटदार सदरी असलेल्या नोंदी रद्द करून इतर हक्क सदरी घेण्याबाबत शासनाकडून कोणतेही निर्देश अथवा सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

तथापि, सातारा जिल्ह्यात देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण होवू नये म्हणून देवस्थानची नावे कब्जेदार सदरी दाखल करून वहिवाटदारांची नावे इतर अधिकारात दाखल करण्यात आल्याचे शासनाच्या निर्दशनास आले आहे.

(२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करण्याबाबत शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३/०३/२०१६ अन्वये राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भुमिका ठरविण्याकरीता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर समितीचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## नवे पारगाव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी भूखंड वाटप करण्याबाबत

**(२५) * १५६८७ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवे पारगाव (ता. हातकणंगले जि. कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीजवळील एकूण १७८ पात्र पूरग्रस्तांना पुनर्वसनाकरिता पूर्वी गट क्रमांक ५७४/ब मधील गायरान भूखंड देण्याचे निश्चित करण्यात आले असतानाही आजपर्यंत त्या पूरग्रस्तांना भूखंड वाटप झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यःस्थितीत संबंधित ओबीसी सेवा संघ व स्थानिक नागरिकांकडून गट क्रमांक १३०१ मधील भूखंड पुनर्वसनासाठी देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली असून यासंदर्भात उप सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे पूरग्रस्त नागरिकांनी स्थलांतरास संमती दर्शविलेली असूनही प्रत्यक्ष भूखंड वाटपाची प्रक्रिया प्रलंबित राहिल्याने त्यांच्या पुनर्वसनास अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नवे पारगाव येथील १७८ पूरग्रस्तांना तातडीने भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) मौजे पारगाव, ता.हातकणंगले येथील गावठाण विस्तार योजनेंतर्गत गट नं. ५७४/ब मध्ये एकूण भूखंड संख्या ३९४ आहे. त्यापैकी २९८.५ भूखंड पूरग्रस्त, आजी सैनिक यांना व इंदिरा आवास योजनेसाठी वाटप करण्यात आलेले आहेत. उर्वरित ९५.५ भूखंडावर गावातील लोकांनी अतिक्रमण केलेले असून सदर अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी नोटीस दिल्या असता संबंधितांनी सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांच्याकडे दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने मनाई आदेश पारित केलेला असल्याने व पुरेसे भूखंड उपलब्ध नसल्याने १७८ पात्र पूरग्रस्तांना गट नं. ५७४/ब मध्ये भूखंड वाटप करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे.
(२) अध्यक्ष, ओ.बी.सी. सेवा संघ पारगाव यांच्या दिनांक ०३.११.२०२२ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात आलेले आहे, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही. स.नं. १३०१ मध्ये एकूण क्षेत्र ३८,८८३.७० चौ.मी. असून त्यापैकी १६,८०० चौ.मी. क्षेत्र अतिक्रमण विरहीत असल्याचे उप अधीक्षक, भूमी अभिलेख, हातकणंगले यांनी कळविलेले आहे. त्यामुळे सदर १६,८०० चौ. मी. क्षेत्र १७८ पूरग्रस्तांना भूखंड वाटप करण्यासाठी उपलब्ध असून भूखंड पाडून नागरी सुविधांसह भूखंड वाटप करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागात स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीकडून वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येत असल्याबाबत

**(२६) * १६१३८ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीकडून समाजकल्याण विभागांतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट व अपुरे भोजन दिले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीकडून भोजन पुरवठा करताना निदर्शनास आलेल्या त्रुटींमुळे उक्त कंपनीचे कंत्राट रद्द करण्याची मागणी समता सैनिक दल व इतर संघटनांनी सहाय्यक आयुक्त, नागपूर यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सकस भोजन पुरवठा करण्याबाबत व उक्त कंपनीचे कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांनी प्रत्यक्ष वसतिगृहास भेट देऊन चौकशी केली असता स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीकडून भोजन पुरवठा करताना शासन निर्णय दिनांक १९.०६.२०२५ मध्ये निश्चित केलेल्या ई-निविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले. त्यानुसार कंपनीच्या माहे सप्टे (रु.३०,९७०/-) व माहे ऑक्टोबर, २०२५ (रु.५९,२८०/-) च्या देयकातून एकूण रू.९०,२५० /- इतक्या दंडाची रक्कम कपात केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड मढ किनारा क्षेत्रात (सीआरझेड) बांधण्यात आलेल्या बांधकामाशी संबंधित कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत

**(२७) * १५८२७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड मढ किनारा क्षेत्रात (सीआरझेड) परिसरात बांधण्यात आलेल्या बांधकामाशी संबंधित सुमारे २४ हजार कागदपत्रे गहाळ झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गहाळ कागदपत्रांची माहिती मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली असता मा.न्यायालयाने गहाळ कागदपत्रांचा तातडीने शोध घ्यावा व शोध न लागल्यास स्वतंत्र गुन्हा दाखल करण्याचे पश्चिम उपनगराचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसात स्वतंत्र गुन्हा दाखल केला आहे काय, असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यासह गहाळ कागदपत्रे परत मिळविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) सदर बाब अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांचे कार्यालयाशी संबंधीत आहे. सदर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका (स्टॅ.) क्र.१३५५२/२०२४ मध्ये याचिकाकर्ता यांनी दिनांक २६/०९/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीवेळी कागदपत्रे गहाळ झाल्याबाबतचा दावा केला होता. त्यानुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अशी कागदपत्रे गहाळ झाली असल्यास, चौकशी करण्याचे आदेश दिले होते. तथापि, अशी कोणतीही कागदपत्रे गहाळ झाली नसल्याबाबत अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांनी दिनांक १५/१०/२०२५ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पीक विमा योजनेचे निकष बदलण्याबाबत**

**(२८) * १६०२२ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने पिकविमा मिळविण्यासाठी आवश्यक असलेले पाचपैकी चार निकष रद्द करून केवळ “पिक कापणी प्रयोग” (Crop Cutting Experiment) हाच एकमेव निकष ठेवण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा होणार नसल्यामुळे पूर्वीच्या योजनेतील विविध निकष पुन्हा लागू करावेत, अशी मागणी लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून सातत्याने केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) होय,
(३) खरीप, २०१६ पासून केंद्र शासनाने, “प्रधान मंत्री पीक विमा योजना” सुरु केली आहे. त्यास अनुसरुन राज्यात देखील सदर योजना खरीप हंगाम, २०१६ पासून राबविण्यात येत आहे.

या योजनेबाबत केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार “पीक कापणी प्रयोगावर आधारित उत्पादनातील येणाऱ्या घटीच्या आधारे नुकसान भरपाई” ही जोखीम बाब अनिवार्य होती. तर अतिरिक्त ४ जोखीम बाबी या अनिवार्य नव्हत्या. राज्य शासनास अतिरिक्त ४ पैकी कोणत्याही जोखीम बाबींसहित किंवा त्याविरहीत विमा योजना राबविण्याचे स्वातंत्र्य होते. मात्र, राज्याने अनिवार्य, तसेच अनिवार्य नसलेल्या अतिरिक्त ४ जोखीम बाबींचा समावेश करुन नुकसान भरपाई देण्याचे निश्चित केले होते.

मात्र, या सर्व जोखीम बाबींचा समावेश करुन सदर योजना लागू केल्यानंतर, विशेषत: १ रुपयात पीक विमा योजना सुरु झाल्यावर, योजनेचा अयोग्य प्रकारे लाभ घेण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन, मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने अनिवार्य केलेल्या पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, त्यानुसार सन २०२५-२६ पासून सुधारित पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

याखेरीज प्रतिकूल हवामान बदलामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या आव्हानांना तोंड देता यावे, याकरिता राज्य शासनाने कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषि समृध्दी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड पश्चिम येथील अक्सा समुद्र किनारी बांधण्यात आलेले अनधिकृत समुद्र पदपथ

**(२९) * १५८३३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिम येथे महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत अक्सा समुद्र किनारा सुशोभिकरण प्रकल्प हाती घेतला असून उक्त प्रकल्पांतर्गत सुमारे रु.१० कोटीपर्यंतचा खर्च करुन बांधलेले समुद्र पदपथ बेकायदा असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे किनारा नियमन क्षेत्राचे (सीआरझेड) उल्लघंन झाल्याने तेथील रहिवाशांनी याबाबत आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हरित लवादाकडे हे प्रकल्प न्यायप्रविष्ट असताना प्रकल्पाचे काम योग्य नसताना तीन वेळा परवानगी नाकारुन चौथ्या वेळी परवानगी मिळवून कामाला स्थगिती मिळेपर्यंत ९० टक्के काम पूर्ण केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त नियमांचे उल्लंघन करून समुद्री पदपथ विकसित करण्याच्या कंत्राटदारावर तसेच बेकायदा परवानगी देऊन निधी मंजूर करणाऱ्या सर्व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

मालाड पश्चिम, मुंबई येथे अक्सा बीच सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) व राज्य पर्यावरण प्रवाह मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांची आवश्यक पर्यावरणीय परवानगी तसेच केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान शाळा (CWPRS), पुणे यांचे अभिप्राय घेऊनच सदर काम हाती घेण्यात आले आहे. तद्‌नंतर सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मात्र, सदर कामासंदर्भात Nat connect foundation या पर्यावरणवादी संघटनेने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडे मे, २०२३ मध्ये आक्षेप नोंदविला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे ९५% आणि किनारी सुशोभीकरणाचे २५% काम पूर्ण झाल्यावर मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिनांक १.१२.२०२३ रोजी पुढील आदेशापर्यंत काम न करण्याचे आदेश दिले होते. तद्नंतर मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी यासंदर्भात दिनांक १६.०९.२०२५ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयासंदर्भात महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करण्यात आले. या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २०.११.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.राष्ट्रीय हरित लवादाचे दिनांक १६.०९.२०२५ रोजीच्या आदेशाला स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोरवा (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील तहसील कार्यालयात**
**शेतकऱ्याने विष प्राशन करून केलेली आत्महत्या**

**(३०) * १५६२१ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरवा (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील शेतकरी श्री.परमेश्वर ईश्वर मेश्राम यांनी तहसील कार्यालयात विष प्राशन केल्यामुळे त्यांचा दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेनंतर संबंधित शेतकऱ्याची पत्नी श्रीमती वंदना मेश्राम यांच्यावर सदर प्रकरणात भद्रावती तालुक्यातील तहसिलदार श्री.राजेश भांडारकर व नायब तहसीलदार श्री.सुधीर खांडरे यांच्यासह काही स्थानिक नेत्यांनी दबाव टाकला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने संबंधित तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्यावर कारवाई करण्यासह मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रकरणाशी संबंधित तहसिलदार व नायब तहसिलदार यांना शासन आदेश दिनांक ०३.१०.२०२५ अन्वये विभागीय चौकशीच्या अधिन राहून शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

तसेच मृतक परमेश्वर मेश्राम यांचे नावे मौजे केसुर्ली येथे सर्वे क्र.१०/३ आराजी ०.८३ हे.आर. सामाईक शेती आहे. परंतु, मृतक किंवा त्यांचे कुटुंबातील व्यक्तीने पिक कर्जे घेतले नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे किंवा मान्यता प्राप्त सावकाराकडून कर्ज घेतले नसल्याने तसेच त्यांनी नापिकामुळे आत्महत्या केली नाही. त्यामुळे सदर शेतकरी आत्महत्या विषयक लाभात मोडत नाही. परंतु, मृतकांच्या कुटुंबांना संजय गांधी निराधार योजना व अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ

**(३१) * १५९३२ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र सरकारच्या राष्ट्रीय गुन्हे अहवाल (NCRB) २०२३ नुसार महाराष्ट्रात अंदाजे ६६६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून विशेषत: मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व नांदेड जिल्ह्यांमध्ये माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२५ मध्ये सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पडलेला दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारातील खरेदीदरातील घट, अतिवृष्टी, पिकांचे होणारे नुकसान व वाढीव कर्ज या व अशा अनेक कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आत्महत्या करणारे सर्व शेतकरी हे २५ ते ४५ वयोगटातील असून, त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबाच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मदत मंजुरी प्रक्रियेसाठी तालुका स्तरावरील समित्यांकडून कागदपत्रे उशिरा पाठविणे किंवा पडताळणी प्रक्रिया धिम्या गतीने राबविली जात असल्यामुळे मंजुरीला विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबापैकी किती कुटुंबे मदतीसाठी पात्र व अपात्र ठरविण्यात आली आहेत,

(६) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना सरकारी पुनर्वसन योजना, कर्जमुक्ती योजना किंवा त्यांच्या मुलांना शिक्षण सहाय्य योजनेचा लाभ देण्यासह कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) छत्रपती संभाजी नगर, जालना व नांदेड जिल्ह्यातील एकुण ९५ प्रकरणांपैकी २० प्रकरणे पात्र करण्यात आली असून अपात्र प्रकरणे निरंक असून उर्वरित ७५ प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित आहेत.

(६) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०१९/प्रक्र. ३४म/७, दिनांक १८.०६.२०१९ अन्वये कार्यवाही करण्यात येते.

(७) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून खालीलप्रमाणे विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

आत्महत्या रोखण्याकरीता शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे, पिक/ शेतजमिनीची/पशुधनाची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना तात्काळ वाटप करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इत्यादी बाबी जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.

-----------------

## भंडारा, गडचिरोली व यवतमाळ जिल्ह्यातील अवैध रेती उत्खननाबाबत

**(३२) * १६१४३ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात चुल्हाड ते चांदपूर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ९ कोटींच्या सिमेंट रस्ता बांधकामात चोरीच्या रेतीचा वापर होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गडचिरोली जिल्ह्यातील खनिकर्म विभागात रेती घाटांचा लिलाव होण्यापूर्वी दलालांचा हस्तक्षेप होत असून रेतीचे वारेमाप उत्खनन, बेसुमार वाहतूक तसेच दलाल व अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयातील अवैध गौण खनिज प्रकरणात जिल्हा प्रशासनाने तपासणीची कारवाई करत १५ हजार ६६५ अवैध रेती साठा व वाहने जप्त केली असून याप्रकरणी २९ कोटींपेक्षा अधिक दंड प्रस्तावित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राळेगाव, वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात मोठ्या प्रमाणात रेती उपसा व वाहतूकीस बंदी असतानाही अवैध रेती वाहतूक सुरु असून याकडे महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी दोषींवर कारवाई करण्यासह विभागात पारदर्शकता आणून गैरव्यवहार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी उपविभागामधील मौजा मद्दीकुठां, ता.सिरोंचा येथील स.क्र.३५६ मध्ये १५,६६५ ब्रास रेती अवैध रेती साठा केल्याचे आढळून आल्याने संबंधिताविरुध्द सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,अहेरी यांनी दिनांक १०.१०.२०२५ च्या आदेशान्वये रु.२९,१३,६९,०००/- एवढया रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तसेच गौण खनिजाच्या अनाधिकृत वाहतूक कामी वापरात आणलेल्या विविध वाहनांकरीता एकूण ३३,८०,२००/- एवढया रकमेचे दंडात्मक आदेश पारित केलेले आहेत.

(४) नाही, तथापि, यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव व वणी तालुक्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्याकीरता महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्या भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच अवैध रेती उत्खनन व वाहतूक प्रकरणी आळा घालण्यासाठी पोलीसांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

राळेगांव व वणी तालुक्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीच्या एकूण ८९ प्रकरणी एकूण रु.०२,४९,०१,०४५/- एवढा दंड आकारण्यात आलेला आहे व ४६ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(५) गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी उपविभागामधील मौजा मद्दीकुठां, ता.सिरोंचा येथील स.क्र.३५६ मध्ये अवैध रेती साठा केल्याचे आढळून आल्याच्या प्रकरणी तहसिलदार, सिरोंचा, मंडळ अधिकारी, सिरोंचा व ग्राम महसूल अधिकारी, नगरम त.सा.क्र.०८ यांच्यावर निलबंनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच वाळू व इतर गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणे विविध कायदे/अधिनियम/नियमान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १७.०७.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये क्षेत्रिय यंत्रणेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## कोकणातील मत्स्य निर्यातदारांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(३३) * १५८४१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमेरिकेने भारतावर लादलेल्या सीमा शुल्क (टॅरिफ) व वाढीव शुल्कामुळे निर्यात होणाऱ्या मासळी तसेच मत्स्य पदार्थांच्या किंमती ५० टक्क्यांनी वाढल्याने कोकणातून अमेरिकेत होणारी मत्स्य निर्यात ४० टक्क्यांनी घटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमेरिकेने लादलेल्या टॅरिफमुळे मत्स्य निर्यातदारांचे मोठे नुकसान होत असून कोकणातील मत्स्यव्यवसाय संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मत्स्य निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) होय, हे खरे आहे. अमेरिकन टॅरीफ बाबत कार्यवाही करणे ही बाब केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. तथापि, यामुळे कोकणातून अमेरिकेत होणारी मत्स्य निर्यात ४० टक्क्यांनी घटली असल्याबाबत सागरी मत्स्य उत्पादन निर्यात विकास प्राधिकरण, कोचीन यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेण्यात आली आहे. सदर विभागाच्या अहवालानुसार, अमेरीकन टॅरीफच्या परीणामामुळे कोकण विभागातील निर्यातदारांकडून (कर्नाटक, गोवा आणि महाराष्ट्र) गतवर्षांच्या तुलनेत निर्यातीत ३६.६% ने वजनात व ३८.८७% किंमतीमध्ये घट/तूट झाल्याचे दिसुन येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत कोकणातील मत्स्य कोळंबी निर्यातदार व उत्पादक यांच्या समवेत दिनांक १३/०८/२०२५ रोजी मा. मंत्री, मत्स्यव्यवसाय व बंदरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. दिनांक २२/०२/२०२५ रोजी भा.कृ.अनु.प. केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्था, वर्सोवा, अन्धेरी, मुंबई येथे भा.कृ.अनु.प. केंद्रीय खारा जलजीव पालन अनुसंधान संस्था, चेन्नई, भा.कृ.अनु.प. केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्था, वर्सोवा, मुंबई, सागरी उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (MPEDA), मत्स्यव्यवसाय विभाग व अन्य संस्थांसोबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सदरच्या चर्चासत्रास एकुण ७० मत्स्य कोळंबी संवर्धक, निर्यातदार, प्रक्रियाकारक, स्थानिक मत्स्य/कोळंबी विक्रेते व इतर भारधारक उपस्थित होते. मत्स्य/कोळंबी संवर्धकांना तात्काळ आर्थिक दिलासा म्हणुन शासनाने मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार, मत्स्य कास्तकार, मत्स्य व्यवसायीक इत्यादींना वीजदरात सवलत देणेकरीता कार्यपध्दती निश्चित करणेबाबत दिनांक १४/१०/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमीत केला आहे. तसेच दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व मत्स्य/कोळंबी संवर्धक यांना किसान क्रेडीट कार्ड (KCC) अंतर्गत रु. २.०० लक्ष (अक्षरी रु. दोन लक्ष मात्र) अल्प मुदतीच्या कर्जावर ४% व्याजाची सवलत मंजुर करण्यात आलेली आहे, त्याच प्रमाणे प्रस्तुत विषयास अनुसरून केंद्र शासनाकडून वस्तू व सेवा कराच्या (GST) टप्प्यात १८% वरून ५% वर आणण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व इतर महामंडळांनी दिलेल्या कर्जाची वसुली करण्याबाबत

**(३४) * १६४९२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अनुसूचित जाती अर्थ आणि विकास महामंडळ व राष्ट्रीय सफाई कर्मचारी अर्थ आणि विकास महामंडळ ही केंद्र सरकारची दोन आर्थिक विकास महामंडळे राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या महामंडळांना ना नफा ना तोटा तत्वावर खेळत्या भांडवलासाठी अडीच ते तीन टक्क्यांनी कर्जपुरवठा करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या महामंडळासाठी ६०० कोटीची हमी दिली असतानाही महामंडळाकडे आधीची थकीत रक्कम २५० कोटी मिळाल्याशिवाय दिल्लीतील आर्थिक विकास महामंडळाकडून आर्थिक पुरवठा करण्यास केंद्र शासनाकडून नकार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील दुर्बल घटकांना व्यवसायाकरिता अल्प व्याजदरात कर्ज देऊन स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता महात्मा फुले मागास वर्ग महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ व रोहिदास चर्मोद्योग महामंडळ या तीन महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तीन विकास महामंडळाची सन २०१० पासून ८५ टक्के कर्जधारकाची ८०० कोटीची कर्जे थकित राहिल्याने सरकारला आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज उभारणीसाठी नव्याने ७५० कोटींची शासकीय हमी उपलब्ध करुन द्यावी लागल्याने ही महामंडळे दिवाळखोरीच्या उंबरठयावर आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित चालविण्यात येणारे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जवळपास ३५ हजार कर्जदारांनी थकविलेल्या कर्जामुळे तसेच कर्जवाटपात झालेला गैरव्यवहार व कर्जवसुलीसाठी सक्षम यंत्रणा महामंडळांकडे नसल्याने महामंडळे दिवाळखोरीच्या उंबरठयावर असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दुर्बल घटकातील गरजवंतांना व्यवसायासाठी कर्ज देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

१.राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महात्मा फुले मागाासवर्ग विकास महामंडळास २.५ ते ४ % दराने कर्ज पुरवठा केला जातो.

२.राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ((NSKFDC) नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महामंडळास २ ते ४.५ % दराने कर्ज पुरवठा केला जातो.

(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही,

राष्ट्रीय महामंडळांकडून प्राप्त होणाऱ्या कर्जांसाठी एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी नवी दिल्ली यांना त्यांच्या Lending Policy नुसार शासन हमी देणे आवश्यक आहे त्यानुसार राज्य शासनाकडून शासन हमी दिली जाते. त्याअंतर्गत राष्ट्रीय महामंडळाकडून राज्य महामंडळांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. यापूर्वी सन २०१९ मध्ये पाच वर्षांसाठी अशी शासन हमी देण्यात आली होती. त्याची मुदत सन २०२४ ला समाप्त झाल्याने नव्याने पुढील पाच वर्षांसाठी नमूद तिनही महामंडळांना मिळून रू.७५० कोटी एवढ्या रकमेची शासन हमी देण्यात आलेली आहे.

(५) हे खरे नाही.

तथापि, थकबाकी वसुलीसाठी महामंडळाने खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

१. प्रादेशिक ‘वॉर रूम ची स्थापना
२. संगणकीकृत मॉनिटरिंग प्रणाली
३. वसुली जागरूकता मेळावे / शिबिरे
४. नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना प्रोत्साहन
५. केंद्रीकृत कॉल सेंटरची स्थापना
६. कायदेशीर नोटिसेस व न्यायालयीन कारवाई
७. जिल्हास्तरावर वसूली नोटिस मोहीम
८. जामीनदारांच्या पगारातून थेट कपात
९. लोक अदालत माध्यमातून तडजोड करणे.

(६) महामंडळाच्या कर्ज प्रक्रियेत वेळोवेळी केलेल्या आढाव्यानुसार, जिथे कुठे अनियमितता किंवा गैरव्यवहार निदर्शनास आले आहेत, तिथे संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही कडक निरीक्षण ठेवण्यात येत आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.